# ॥ पादुकांची प्रार्थना ॥

सांगावे, कवण्या ठायां जावें। कवणातें स्मरावे।
कैसें काय करावे। कवण्यापरि मी रहावें।
कवण येऊनि कुरूंदवाडी स्वामीते मिळवावें ॥ धृ.॥
या हारी। जेवावें व्यवहारी। बोलावे संसारी।
घालुनी अंगिकारी। प्रतिपाळिसी जो निर्धारी।
केला जो निज निश्चय स्वामी कोठें तो अवधारी॥ सांगावे.॥
या रानीं। माझी करुणावाणी। काया कष्टी प्राणी।
ऐकूनी घेशिल कानीं। देशिल सौख्य निदानीं।
संकटी होउनी मूर्च्छित असतां पाजिल कवण पाणी॥ सांगावे.॥
त्यावेळा॥ सत्पुरुषांचा मेळा। पाहतसे निज डोळां।
लाविसी भस्म कपाळा। सांडी भय तूं बाळा॥
श्रीपादश्रीवल्लभ म्हणती। अभय तुज गोपाळा॥ सांगावे.॥